5 February 2009

ॐ श्री परमात्मने नमः ॥

श्रीमद्भगवद्‌गीता

भगवद्‌गीता हे सर्व शास्त्रांचे शास्त्र आहे. सर्व कलांची कला आहे. सर्व तत्त्वज्ञानांचा मुकुटमणी आहे. उपनिषदांचे मथून काढलेले सार आहे.

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत्॥

सर्व उपनिषदे जणू गाई आहेत. त्यांचे दोहन करणारा प्रत्यक्ष श्री गोपालनंदन श्रीकृष्ण आहे. पार्थ हे जणू वासरू आहे. गीतेचे अनुष्ठान करणारा बुद्धिमान जीव हा अमृत प्राशन करणारा भोक्ता आहे. यासाठी मोक्षासारखे श्रेष्ठ फल आहे गीतामृत.

गीतेला प्रस्थानत्रयीमध्ये स्थान आहे. मानवाला जर आत्मोद्धार करून घ्यायचा असेल आत्मोन्नतीच्या मार्गाने जायचे असेल म्हणजेच प्रेयसाकडून श्रेयसाकडे जायचे असेल तर परब्रह्म म्हणजे ईश्वर जाणून घ्यायला पाहिजे आणि ईश्वर जाणण्यासाठी प्रमुख साधन म्हणजे प्रस्थान

वैदिक प्रस्थानत्रयी - उपनिषद, ब्रह्मसूत्र आणि भगवद्‌गीता

वेद हे मानवनिर्मित नाहीत. ते अपौरुषेय आहेत. वेदवाङ्मय हे अक्षर वाङ्मय आहे. वेद ही साक्षात देववाणी आहे. हे मानवाने निर्माण केले नाहीत. ऋषींना वेद दिसले - (ऋषिर्दर्शनात्) असे म्हटले जाते. पूर्वी सर्व वेद एकत्रच होते. त्यानंतर महर्षि व्यासांनी

© www.madhaveeraghuveer.com

त्यांचे चार भागात वर्गीकरण केले.
१) ऋग्वेद २) यजुर्वेद ३) सामवेद ४) अथर्ववेद
ही निर्मिती इ०स० पूर्वी चार ते पाच हजार वर्षांपूर्वी सप्तसिंधू प्रदेशात झाली. वैदिक वाङ्मयाचा शेवटचा भाग म्हणजे वेदान्त म्हणजेच उपनिषदे ह्या उपनिषदांचे सार गीतेत उतरले आहे. म्हणूनच प्रत्येक अध्यायाच्या शेवटी 'उपनिषत्सु' असे म्हणतात.

उपनिषदांना ब्रह्मविद्या म्हणून संबोधले जाते. अत्यन्त भक्तिभावाने गुरुजवळ बसून शिष्य जी परमार्थविद्या संपादित करतो तीच उपनिषद [उप + नि + षद्] प्रेयसात न रमता श्रेयसाकडे जावे असे उपनिषदांचे सांगणे आहे

हे सारे जगत ब्रह्म आहे. हे ब्रह्मातूनच उत्पन्न झाले. ब्रह्मातच अवस्थित आहे. पुढे ब्रह्मातच विलीन होणार आहे.

~~ॐ पूर्णमिदं~~

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

वेद, उपनिषदे, धर्मशास्त्र, नीतिशास्त्र यामध्ये सिद्धान्त सांगितले आहेत. त्यात सांगितलेले तत्त्वज्ञान आकलन होण्यासाठी कठीण आहे आणि क्लिष्ट आहे. अतिशय ज्ञानी, पंडितांचा हा विषय आहे असे सर्वसामान्य माणसांना वाटते. शिवाय या विद्वानांमध्ये सैद्धांतिक वादविवादही खूप झाले. त्यातून अनेक पंथ निर्माण झाले. त्या त्या पंथाचे लोक दुसऱ्या

© www.madhavaweeragruveer.com

पंथांचे खंडन करू लागले.

वेदांमध्ये स्वर्गादि गोष्टींची प्राप्ती करून देणारे यज्ञयाग सांगितले आहेत, तर उपनिषदे म्हणजे मोक्षात्मक आत्मविद्या! वेद हे त्रिगुणांनी युक्त आहेत तर वेदांत किंवा उपनिषद यामध्ये प्रामुख्याने सत्वगुणच दिसून येतो.

उपनिषद - उपनिषदांची संख्या सव्वादोनशेच्या वर आहे तरी त्यातील १०८ उपनिषदे महत्वाची आहेत आणि त्यापैकी १० उपनिषदे प्रमुख आहेत.

१. ईशावास्य २. ऐतरेय ३. कठ ४. केन ५. तैत्तिरीय ६. प्रश्न ७. बृहदारण्यक ८. मुण्डक ९. माण्डूक्य १०. श्वेताश्वतर

ब्रह्मसूत्रे (न्यायप्रस्थान) दर्शने - लौकिक व पारमार्थिक तत्वांचे ज्ञान ज्यामुळे होते त्यांना दर्शने असे म्हणतात. त्यात आस्तिक दर्शने व नास्तिक दर्शने असे दोन भाग आहेत. वेद प्रमाण मानणारे ते आस्तिक आणि वेद प्रमाण न मानणारे ते नास्तिक.

ज्याच्या योगाने यथार्थतत्व पाहिले वा अनुभवले जाते ते शास्त्र म्हणजे दर्शन होय. दृश् - पाहणे या धातूपासून दर्शन हा शब्द आला आहे. दर्शन म्हणजे आत्मसाक्षात्कार होय.



जगत, जीव, ईश्वर, मोक्ष हे प्रमुख चार प्रतिपाद्य विषय आहेत एकत्वात अनेकत्वाची अभिव्यक्ती आणि अनेकत्वात एकत्वाचे दर्शन हे षड्दर्शनाचे लक्षणीय वैशिष्ट्य आहे.

आस्तिक दर्शने सहा तर नास्तिक दर्शने तीन आहेत.

© www.madhayeeraghuveer.com

आस्तिक दर्शने

१. न्याय - गौतम ऋषी
२. वैशेषिक - वैशेषिक ऋषी
३. सांख्य - कपिल मुनी
४. योग - पतंजली
५. पूर्व मीमांसा - जैमिनी
६. उत्तर मीमांसा - बादरायण व्यास

पूर्वमीमांसेचा प्रारंभ अथातो धर्मजिज्ञासा - कर्मकांड
उत्तर मीमांसेचा प्रारंभ अथातो ब्रह्मजिज्ञासा - शुद्ध उपासना

नास्तिक दर्शने

१. जैन   २. बौद्ध   ३. चार्वाक

प्रस्थानत्रयींपैकी वेद अभ्यासण्यासाठी विद्वत्ता आवश्यक आहे. दार्शनिक म्हणजे ब्रह्मसूत्रे ५५४ आहेत. प्रत्येक सूत्र दिसायला लहान दिसले तरी खूप मोठा सिद्धांत त्यामध्ये मांडलेला दिसतो. आशयगर्भ आणि अर्थगर्भ अशी ब्रह्मसूत्रे आकलन होण्यासाठी विलक्षण कुशाग्र बुद्धी पाहिजे. त्याच बरोबर तर्कशक्ती ही पाहिजे.

भगवद्गीता ही स्मार्तप्रस्थानात येते. स्मार्त म्हणजे स्मृतिविहित किंवा विवेकाधिष्ठित धर्ममार्ग. उपनिषदे आणि ब्रह्मसूत्रे कठीण आहेत. त्या मानाने भगवद्गीता सुलभ, रसाळ आहे. उपनिषद, ब्रह्मसूत्रांमध्ये जे तत्त्वज्ञान आहे, सिद्धांत आहेत, शास्त्र आहे ते प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी जी जीवनकला आवश्यक

© www.madhaveeraghuveer.com

| February | | | | | | March | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Week | 05 | 06 | 07 | 08 | 09 | Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
| Monday | | 2 | 9 | 16 | 23 | Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 | Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 | Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 | Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 | Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 | Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | | Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

9.00 आहे ही कला गीता आपल्याला शिकवते म्हणूनच गीतेला शास्त्रांचे शास्त्र आणि कलांची
10.00 कला म्हटले आहे.

संगीतशास्त्राचा जरी कितीही अभ्यास केला,
11.00 राग, सूर, ताल यांच्या व्याख्या कंठस्थ केल्या तरी गळ्यातून नसता सूर काढण्याची कला
12.00 अवगत असायला हवी तरच त्याचा उपयोग

त्याचप्रमाणे शास्त्राभ्यास खूप केला तरी जोपर्यंत
1.00 त्याला स्वतःच्या प्रज्ञेची किंवा विवेकाची जोड दिली जात नाही तोवर ते पढणं व्यर्थच आहे।

2.00 यस्य नास्ति स्वयं प्रज्ञा शास्त्रं तस्य करोति किम्?
लोचनाभ्यां विहीनस्य दर्पणः किं करिष्यति?

3.00 कितीही शास्त्रवचने धुंडाळली, कितीही ग्रंथ अभ्यासले तरी जोवर स्वतःची प्रज्ञा त्याच्याशी
4.00 जोडली जात नाही तोवर हा वृथा खटाटोपच!

चार पढतमूर्खांचे उदाहरण.

5.00
१. महाजनो येन गतः स पन्थाः।
२. राजद्वारे स्मशाने च यस्तिष्ठति स बान्धवः।
6.00
३. दीर्घसूत्री विनश्यति।
४. कार्यकाले समुत्पन्ने अर्धं त्यजति पण्डितः।

7.00
8.00

© www.madhaveeraghuveer.com

भगवद्गीतेची भाषा अतिशय सोपी, सुलभ आहे संस्कृतचे थोडेसे ज्ञान जरी असले तरी बराचसा अर्थ समजू शकतो.

शुद्ध, स्पष्ट उच्चारण मात्र व्हायला हवे. त्यासाठी जाणकार व्यक्तीकडून मार्गदर्शन घ्यावे. कारण भगवद्गीतेतील प्रत्येक श्लोक हा मंत्र आहे. मननात त्रायते इति मंत्रः।

या गीतेच्या नित्य पठनाने त्या व्यक्तीवर सुपरिणाम होतो. उच्चार अधिकाधिक स्पष्ट, शुद्ध होत जातात. जिभेला योग्य वळण लागते. स्मरणशक्ती वाढते. शरीरातील अंतस्रावी ग्रंथींवर योग्य परिणाम होऊन पचन सुधारते. गीता म्हणत असताना नैसर्गिक रीतीने प्राणायाम होऊन श्वसनाचे अनेक आजार आश्चर्यकारकरित्या बरे होतात. श्रद्धेने पठण केले असताना अनेक शारीरिक तसेच मानसिक व्याधी पूर्णपणे ब-या होतात. मनातील वाईट विचार लोप पावून हळूहळू केवळ चांगलेच विचार मनात येऊ लागतात. क्षमाशीलता वाढते. क्रोधावर काही प्रमाणात तरी नियंत्रण येते. भूतमात्राविषयी प्रेम जिव्हाळा वाढू लागतो. असे अनेक फायदे व्यक्तीला होतात. शिवाय त्या मंत्रोच्चारणातील स्पंदनामुळे वास्तू पवित्र होते. म्हणणाऱ्यांप्रमाणेच ऐकणाऱ्याला सुद्धा शांतीचा लाभ होतो. वातावरण पवित्र होते.

© www.madhaveeraghuveer.com

गीता ही माऊलीच्या ममतेने, वात्सल्याने समजावून सांगते. दहा उपाध्यायांसमान एक आचार्य असतो. शंभर आचार्यांसमान पूज्य पिता असतो. आणि पित्यापेक्षा मातेची थोरवी सहस्रपटीने असते.

एकदा गीतामातेचे बोट धरले की ती तुम्हाला हाताला धरून चालवते. आनंदाच्या प्रसंगी आनंद वाढवते. संकटात बळ देते. दुःखात फुंकर घालते.

अशी ही गीता कुरुक्षेत्रावर भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितली. खरं तर अर्जुनाला निमित्त करून भगवान श्रीकृष्णांनी अखिल मानवजातीवर मोठे उपकारच केले आहेत. भौतिक आणि अध्यात्मिक अशा सर्व समस्यांचे निराकरण गीतेमध्ये आढळते. फक्त आपण ती समजून आणि श्रद्धेने वाचायला [illegible] गीतेमध्ये कशाचेही खंडन केले नाही. मंडन मात्र निश्चितच आहे. गीता कोणत्याही वादात पडत [illegible]

गीता ही कोणत्याही विशिष्ट वर्गाला, [illegible] डोळ्यासमोर ठेवून सांगितली नाही तर जो जो माणूस म्हणून जन्माला आला आहे अशा प्रत्येकाला ती मार्गदर्शक ठरते. स्वधर्माचरणावर गीतेचा मुख्य भर आहे.

गीता ही नित्यनूतन आहे. म्हणजे ती नित्य असली तरी पुन: पुन: ती नवीनच वाटते. प्रत्येक वेळी तिच्यात नवीनच काहीतरी गवसत जाते. प्रत्येक व्यक्तीनुसार ती प्रत्येकाला वेगळीच भासते. ज्या दृष्टीने तुम्ही बघाल तसे तिचे वेगवेगळे पैलू

© www.madhaveeraghuveer.com

| December '08 | | | | | | January | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Week | 49 | 50 | 51 | 52 | 53 | Week | 01 | 02 | 03 | 04 | 05 |
| Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 | Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 | Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | 31 | Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 4 | 11 | 18 | 25 | | Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 5 | 12 | 19 | 26 | | Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 6 | 13 | 20 | 27 | | Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 7 | 14 | 21 | 28 | | Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

नजरेला पडतात. आणि अगदी एकाच व्यक्तीलासुद्धा जीवनाच्या वेगवेगळ्या वळणावर ती निराळीच भासते. एखादा Calidoscope असावा, या तऱ्ही आहे ती! कोणत्याही कोनातून बघा ती दिसते प्रत्येक वेळी आगळी आणि आकर्षक!

अगदी सर्वसामान्य माणसापासून ते थोर विद्वानांपर्यंत ती सर्वांना खुणावते. आकर्षित करते. अनेक वक्त्यांच्या व्याख्यानांमध्ये गीतेमधील निवडक श्लोकांचा संदर्भ येताना दिसतो. गीता मुखोद्गत करून आत्मोन्नतीचा मार्ग साधणारे साधक तर बहुसंख्य आहेत.

अशी ही गीता भगवंतानी अर्जुनाला सांगितली. स्वजनांशी कसे लढावे? असा विषाद अर्जुनाच्या मनात निर्माण झाला. त्यावर भगवंतांनी त्याला उपदेश केला. त्याच्यातील स्फुलिंग चेतवले आणि स्वधर्माचरणाचे महत्त्व पटवून दिले.

या पार्श्वभूमीवर एक गमतीदार कल्पना केली गेली आहे.

पार्थपुत्रो विषादोऽसि वाक्कन्या परमात्मन: |
तयो: उभयो: जाता सा गीता लोकपावनी ||

पार्थाच्या पोटी जन्मलेला म्हणून त्याचा मुलगा विषाद आणि भगवंतांची वाणीरूपी कन्या यांचा विवाह झाला. त्यांच्यापोटी जी जन्माला आली ती ही 'लोकपावनी' गीता.

© www.madhaveeraghuveer.com

भगवंतांनी ही गीता अर्जुनाला सांगितली आणि हे तत्त्वज्ञान व्यासांनी ग्रंथित केले हे ज्या दिवशी पूर्ण झाले तो दिवस होता - मार्गशीर्ष शुद्ध एकादशी म्हणजेच मोक्षदा एकादशी म्हणजेच 'गीताजयंती'

ह्या ग्रंथातील तत्त्वज्ञान वस्तुत: कठीण आहे परंतु भगवंतांनी ते अतिशय सुलभ करून सांगितले आहे. एक आणि एकमात्र गीतेचा अभ्यास सतत आणि ध्यास घेऊन केला तर अन्य शास्त्रांची गरजच नाही.

गीता सुगीता कर्तव्या किमन्यै: शास्त्रविस्तरै: |
या स्वयं पद्मनाभस्य मुखपद्मात विनि:सृता ||

गीतेमध्ये एकूण ७०० श्लोक आहेत. अठरा अध्याय आहेत. त्यातील प्रधान वक्ता म्हणजे

'भगवान योगेश्वर' — ५७४ श्लोक
प्रश्न विचारणारा अर्जुन — ८४ श्लोक
निवेदन करणारा संजय ४१ श्लोक
ऐकण्याची इच्छा करणारा धृतराष्ट्र १ श्लोक.

———
७०० श्लोक.



ह्या संपूर्ण संवादामध्ये श्रीकृष्ण असा उल्लेख नाही सगळीकडे 'श्री भगवान उवाच' असेच लिहिले आहे भगवंत कोणाला म्हणतात? विष्णुपुराणात उल्लेख आहे. ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, ज्ञान आणि वैराग्य या सहा गुणांचे एकत्रित नाव भग, असे आहे आणि

© www.madhaveeraghuveer.com

| December '08 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 49 | 50 | 51 | 52 | 53 |
| Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

| January | | | | |
|---|---|---|---|---|
| Week | 01 | 02 | 03 | 04 |
| Monday | | 5 | 12 | 19 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 |

हे सहा गुण जो धारण करतो तो भगवंत !

ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः ।
ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इतीरणा ॥

गीतेची रचना अनुष्टुप छंद आणि त्रिष्टुप छंदात आहे. अनु + स्तुभ् म्हणजे ज्याच्या पठणाने आपल्या चित्तवृत्ती स्तब्ध होतात तो अनुष्टुप छंद याचेच 'सरस्वती' असेही नाव आहे. अनुष्टुप छंदात चार चरण असतात. प्रत्येक चरणात आठ अक्षरे याप्रमाणे एका ओळीत सोळा अक्षरे व एका श्लोकामध्ये बत्तीस अक्षरे असतात. तर त्रिष्टुप छंदामध्ये एका चरणात ~~अकरा~~ अकरा अक्षरे असे चार चरण म्हणजे पूर्ण श्लोक ४४ अक्षरांचा असतो.

पार्श्वभूमी - महाभारतातील भीष्मपर्वाच्या तिसऱ्या उपपर्वामध्ये ही गीता आली आहे. हे उपपर्व भगवद्गीतापर्व म्हणून ओळखले जाते. त्यातील २५ ते ४२ असे अठरा अध्याय गीतेचे आहेत.

सामान्यतः युद्ध तीन कारणांसाठी लढले जाते. भूमी, धन आणि स्त्री.

पांडव लढले ते धर्मासाठी. प्रथम त्यांनी युद्ध टाळण्याचा [illegible] प्रयत्न केला परंतु शेवटी नाईलाजाने त्यांना युद्ध करावे लागले. त्यापूर्वी त्यांनी दिलेले वचन पाळले. वनवास व अज्ञातवास भोगला. परंतु एवढे होऊनही जर त्यांचे राज्य त्यांना मिळणार नसेल तर सज्जनांच्या सदाचरणाला काही अर्थच

© www.madhaveeraghuveer.com

डरणार नाही. म्हणूनच भगवंत युद्धाचा हेतू सांगतात

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ॥

आणि अवतार घेण्याची वेळ केव्हा येते हे सांगतात.

कुरुक्षेत्रावर घडलेल्या या धर्मयुद्धात श्रीकृष्णाने बलरामाला शब्द दिला होता त्याप्रमाणे तो (श्रीकृष्ण) सशस्त्र लढला नाही परंतु अर्जुनाचे सारथ्य मात्र केले; आणि हितोपदेश केला. त्याने कौरवांना आपली नारायणी सेना दिली आणि स्वतः मात्र पांडवांचा पाठीराखा राहिला.

कौरवांकडे अकरा अक्षौहिणी सैन्य होते तर पांडवांकडे सात अक्षौहिणी सैन्य होते.

महारथी - जो सर्व अस्त्र, शस्त्र प्रवीण आहे आणि एकाच वेळी दहा सहस्त्र वीरांशी लढू शकतो, त्यालाच महारथी असे म्हणतात

महेष्वास - इषु म्हणजे बाण आणि इष्वास म्हणजे धनुष्य महा + इष्वास म्हणजे प्रचंड आकाराचे धनुष्य. केवळ महारथीच अशी धनुष्ये धारण करीत असत

नियम निःशस्त्र योद्ध्यावर शस्त्र चालवायचे नाही. सूर्यास्तानंतर युद्धाला विराम द्यायचा असे अनेक नियम ठरवण्यात आले होते.

© www.madhaveerguruveer.com

9.00 धृतराष्ट्र आंधळा असला तरी महर्षि व्यास
त्याला दिव्य दृष्टी देणार होते. परंतु पांडवांचा
10.00 पराक्रम त्याला ज्ञात असल्याने धृतराष्ट्राने स्वतःच्या
कुळाचा संहार पहायला नको म्हणून 'दिव्य दृष्टी
11.00 नको' असे सांगितले. परंतु युद्धाचे वर्णन ऐकण्याची
इच्छा आहे असेही सांगितले तेव्हा श्रेष्ठ पुरुषांच्या
12.00 स्वामी असलेल्या संजयला व्यासांनी वर दिला —
प्रकट किंवा अप्रकट, दिवसा किंवा रात्री
1.00 एवढेच नव्हे तर मनात आणलेल्या सर्व गोष्टींचे
ज्ञान संजयला होईल. हा जखमी होणार नाही. संजय
2.00 सुरक्षित राहून युद्धाचे वर्णन करेल.

संजय गवल्गणनावाचे पुराणिक (सूत) होते.
3.00 त्यांचा हा मुलगा. त्याने उत्तम विद्या आत्मसात
केल्या होत्या. सर्वजण त्याचा आदर करीत असत.
4.00 हा धृतराष्ट्राचा मंत्री व सल्लागार होता.
संजयने धृतराष्ट्राची कानउघाडणी केली होती —
5.00 ज्या पुरुषाची अधोगती व्हावी असे देवांना
वाटते, त्याची बुद्धी ते विपर्यस्त करून टाकतात.
6.00 मग अनर्थ अर्थाप्रमाणे, अन्याय न्यायाप्रमाणे वाटू
लागतो आणि विपरीत गोष्टी रुचायला लागतात.
7.00
8.00

©www.madhaveeraghuveer.com

कुरुक्षेत्र - सरस्वती आणि दृषद्वती या नद्यांच्या मध्यवर्ती क्षेत्राला 'कुरुक्षेत्र' म्हणतात. याचे पूर्वीचे नाव स्यमन्तपंचक होते. कुरुंच्या तपश्चर्येनंतर ते कुरुक्षेत्र म्हणून ख्यातनाम झाले. ही अतिशय पवित्र भूमी होती आणि कुरुक्षेत्राचे माहात्म्य म्हणजे इथेच भगवंतांनी अर्जुनाला गीता सांगितली.

गीता म्हणजे भगवंतांची वाङ्मयीन मूर्ती होय. मानवाला आत्मोन्नत करून त्याला स्वरूपाची ओळख करून देणे हाच सात्त्विक हेतू गीतेवरील प्रवचन, कीर्तन, श्रवण, ग्रंथलेखन यांच्यामागे आहे.

माऊलींनी पसायदानात म्हटल्याप्रमाणे 'जो जे वांछील तो ते लाहो' असे ज्याला जे हवे ते देण्याचे अपूर्व सामर्थ्य गीतेत आहे. परंतु त्यासाठी गीतेतील १८ व्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे सात्त्विक कर्म, सात्त्विक ज्ञान, सात्त्विक बुद्धी, धृती यांचे प्रमाण वाढले पाहिजे. १७ व्या अध्यायात सांगितल्या प्रमाणे सात्त्विक आहार, सात्त्विक तप, सात्त्विक दान यांचे आचरण करता आले पाहिजे. कायिक, वाचिक मानसिक तप करायला हवे. १६ व्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे दैवी संपत्ती धारण करता यायला हवी रज तम टाकून सत्त्वगुण वाढीस लागला पाहिजे. काही मिळवण्यासाठी काही टाकावे लागते. आत्मशुद्धीसाठी देहशुद्धी टाकावी लागते. सद्गुणांना देहात जागा करून द्यायची असेल तर दुर्गुण दूर करावे लागतील. हे सर्व प्रयत्नाने जमू शकते. पण त्यासाठी श्रद्धा, निष्ठा, चिकाटी सातत्य असायला हवे. प्रयत्न करणाऱ्यांना यश

# 16 January Friday

Week 03

016-349

2009

**December '08**

| Week | 49 | 50 | 51 | 52 | 53 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

**January**

| Week | 01 | 02 | 03 | 04 | 05 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

9.00 अर्जुनाला केवळ युद्धासाठी उभे करणे हे भगवंतांचे ध्येय नव्हते. अर्जुनाला ब्रह्मविद्या देऊन त्याला

10.00 आत्मज्ञानी करायचे हे भगवंताचे उद्दिष्ट होते.

अर्जुनाच्या ~~[illegible]~~ निमित्ताने ब्रह्मविद्या गीतारूपाने

11.00 उपनिषदे व ब्रह्मसूत्रे यांच्या तुलनेत जगापुढे अधिक सोपी होऊन आली.

12.00 या ब्रह्मविद्येचा स्वानुभव आपणही अर्जुनाप्रमाणे सावधपणे आणि विवेकाने घ्यायचा आहे.

1.00

2.00

3.00

4.00

5.00

6.00

7.00

8.00

© www.madhaveeraghuveer.com